
एकलव्य

# बितवा

कमला भसीन

चित्रे शिवांगी





# मितवा

कमला भसीन


चित्रे शिवांगी

अनुवाद रमा हर्डीकर-सखदेव

एकलव्य

मी पंजाबमधल्या एका शीख कुटुंबातली मुलगी आहे. मी वीस वर्षांची आहे. आम्ही एका गावात राहतो. इथली बरीचशी कुटुंबं शेती करतात. काही शेतकरी खूप श्रीमंत आहेत. त्यांची मोठमोठी शेतं आहेत, त्यांच्याकडे ट्रॅक्टर आहेत. पिकं कापायची मोठमोठी यंत्रंसुद्धा आहेत.









माझे वडीलही शेतकरी आहेत, आमची शेती फार मोठीही नाही किंवा अगदी लहानही नाही. माझी आईसुद्धा शेतकरी आहे. एक नांगर चालवणं सोडलं तर आई शेतावरची सगळी कामं करते. ती शेताला पाणी देते, पेरणी करते, कापणी करते. पण सगळ्यात महत्वाचं काम जे आई करते ते म्हणजे पिकांशी मैत्री आणि त्यांच्यावर प्रेम करणं!

माझं नावं आहे मितवा, म्हणजे प्रिय सखी किंवा सखा! हे नाव मला माझ्या आईने दिलंय. माझा जन्म झाला तेव्हा आईला वाटलं की तिला एक मैत्रीण मिळाली, मनातल्या गोष्टी सांगता येतील अशी एक जिवाभावाची मैत्रीण. मी माझ्या आईची मितवा आणि आई माझी मितवा! माझे दोन मोठे भाऊ आहेत, दलजीत आणि मनजीत.

माझं नशीब चांगलंय कि मला दोन मोठे भाऊ आहेत. जर दोन मोठ्या बहिणी असत्या तर माझा जन्मच झाला नसता. आमच्या गावात कितीतरी मुलींना जन्माला यायच्या आधीच मारून टाकलं जातं. म्हणून इकडे मुली कमी आहेत. मला मुळी कळतंच नाही कि लोक मुलींचा तिरस्कार का करतात आणि त्यांना मुलांपेक्षा कमी का लेखतात.









माझ्या वडिलांचं माझ्यावर प्रेम होतं खरं, पण त्यांना ते दाखवता यायचं नाही. त्यांचं प्रेम कमी आणि वर्चस्व गाजवणं जास्त दिसायचं. वडिलांचं माझ्या दोन भावांवर बहुतेक जास्त प्रेम होतं. ते त्यांना आपल्या सोबत ठेवायचे, बाहेर घेऊन जायचे आणि जास्त स्वातंत्र्य द्यायचे. पण वडील त्यांना खूप रागवायचे सुद्धा. आम्हाला सगळ्यांना वडिलांची भीती वाटायची. त्यांचं आमच्यावर वर्चस्व गाजवणं आम्हाला कोणालाच आवडायचं नाही. सगळ्यात जास्त हुकूम ते आईवर चालवायचे. आईला ते आपली जोडीदार नाही तर दासी समजायचे. पण आई त्यांना कधीच काही बोलायची नाही. माझ्याशी बोलून ती मन हलकं करायची.


मी जवळच्याच गावातल्या सरकारी शाळेतून बारावी पास झाले. मला शाळेत तर पाठवलं गेलं, पण त्या व्यतिरिक्त बाहेर जाण्याचं किंवा खेळण्याचं स्वातंत्र्य मला नव्हतं. वडील म्हणायचे, “चांगल्या घरातल्या मुली बाहेर जात नाहीत.” मी मनातल्या मनात म्हणायचे, “हो ना, फक्त बदमाश मुलंच बाहेर फिरतात.” त्यांच्यामुळेच मुलींना घरी कोंडून राहावं लागतं.

मी मनजीतदादाकडून लपूनछपून सायकल चालवायला शिकले. माझा हा भाऊ खूप प्रेमळ आणि नम्र आहे. तो मला कधीच त्याच्याहून कमी नाही लेखत.










दोन वर्षांपूर्वी वडिलांनी एक ट्रॅक्टर विकत घेतला. माझे दोन्ही भाऊ लवकरच ट्रॅक्टर चालवायला शिकले. त्यांना ट्रॅक्टर चालवताना पाहून वडील फार खूश व्हायचे. मलासुद्धा ट्रॅक्टर चालवायला शिकायची खूप इच्छा होती. मी तेव्हा 18 वर्षांची आणि चांगली हट्टीकट्टी होते. पण वडिलांनी सांगून टाकलं, “मुली ट्रॅक्टर चालवत नाहीत.” त्यांचं बोलणं माझ्या मनाला फार लागलं, पण वडिलांचं म्हणणं बरोबर असो किंवा चूक, ते आम्हाला ऐकावंच लागायचं.


पण आता माझे वडील खूप बदलले आहेत. मी सांगते हा बदल का आणि कसा झाला ते!

सात-आठ महिन्यांपूर्वी एक दिवस अचानक वडिलांना हृदयविकाराचा झटका आला. त्या दिवशी माझे दोन्ही भाऊ काहीतरी कामानिमित्त शहरात गेलेले होते. घरी फक्त आई, दोन शेतमजूर आणि मी इतकेच होतो.

आमच्या गावात कोणी चांगला डॉक्टर नाहीये. मोठं सरकारी रुग्णालय पाच किलोमीटर दूर आहे. वडिलांची तब्येत वेगाने बिघडत चालली होती. त्यांना ताबडतोब रुग्णालयात नेणं अत्यंत गरजेचं होतं. अतिशय घाबरलेल्या आणि निराश आवाजात वडील अस्पष्टसे पुटपुटले, “आत्ता माझे मुलगे इथे असते तर कदाचित माझा जीव वाचला असता!” बोलता बोलता त्यांची शुद्ध हरपली.









परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन मी, आई आणि त्या दोन शेतमजुरांना म्हणाले, “चला, वडिलांची खाट पटकन ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत ठेवुयात. त्यांना रुग्णालयात न्यायचं आहे.” त्या तिघांना आश्चर्याचा धक्काच बसला, पण त्यांनी तेच केलं जे मी सांगितलं.


अजिबात वेळ न दवडता आम्ही रुग्णालयात पोहोचलो. सुदैवाने हृदयविकाराचे डॉक्टर त्या वेळी तिथे होते. त्यामुळे वडिलांवर लगेचच उपचार सुरू झाले. भीतीने आमचा प्राण कंठाशी आला होता. पण थोड्याच वेळात त्यांना बरं वाटू लागलं आणि आम्हा सगळ्यांच्या जिवात जीव आला!


वडील शुद्धीवर आल्यावर आई आणि मी त्यांच्या खोलीत गेलो. त्यांनी डोळे उघडले, आम्हाला पाहिलं आणि हळू आवाजात आईला विचारलं, “मी रुग्णालयात कसा पोहोचलो? मला इथे कोणी आणलं?”

आईने त्यांच्या हातावर हात ठेवला आणि ती हसून म्हणाली, “मितवा! ट्रॅक्टर चालवत तीच तुम्हाला इथे घेऊन आली!”

“मितवा? तिने कसं आणलं? तिला तर ट्रॅक्टर चालवताच येत नाही!” वडील चकित झाले होते.

आई म्हणाली, “मितवा गुपचूप ट्रॅक्टर चालवायला शिकली होती. मनजीतने तिला शिकवलं होतं. वाहे गुरूची कृपाच आहे, की मितवाने तुमचं म्हणणं ऐकलं नाही, आणि आज तुमचा जीव वाचला!”





# मितवा
MITWA

लेखन: कमला भसीन
चित्रे: शिवांगी
डिझाइन: कनक शशि
अनुवाद: रमा हर्डीकर-सखदेव
संपादन: ईशा बडकस आणि रुची शेवडे

CC BY NC ND कमला भसीन, ऑगस्ट 2021

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक शैक्षणिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या कथेचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखकाचा आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कोणत्याही उपयोगासाठी लेखक आणि प्रकाशक यांच्याशी संपर्क करा.

2017 मध्ये मूलतः एकलव्य द्वारे हिंदी मध्ये प्रकाशित.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्ट, मुंबईच्या अर्थसाहाय्यातून प्रकाशित

ऑगस्ट 2021 / 2000 प्रती
मे 2024 / 2000 प्रती
कागद: 100 gsm मॅपलिथो आणि 220 gsm पेपरबोर्ड (मुखपृष्ठ)
ISBN: 978-93-91132-59-0
मूल्य ₹ 60.00

प्रकाशक: **एकलव्य फाउंडेशन**
जमनालाल बजाज परिसर,
जाटखेड़ी, भोपाळ – 462 026 (मप्र)
फोन +91 755 297 7770 71, 72
वेबसाइट: www.eklavya.in; ईमेल: books@eklavya.in

मुद्रक: भण्डारी प्रेस भोपाल (मप्र)

## कमला भसीन

1970 पासून मानवाधिकार, स्त्री समानता आणि विकास या मुद्द्यांविषयी काम करत आहेत. त्या कितीतरी संस्था आणि नेटवर्कसाठी काम करतात. त्यांनी 27 वर्षं संयुक्त राष्ट्रसंघात काम केलं आहे. त्यांचं विशेष काम हे समाज सेवकांना प्रशिक्षण देणं आणि त्यांच्यासाठी सोप्या भाषेत लिखित मजकूर तयार करणं हे आहे. त्या लहानांसाठी सुद्धा लिहितात. कमला जेव्हा प्रवास करत नाहीत तेव्हा दिल्लीत राहतात.

## शिवांगी

स्वतंत्र चित्रकार आहेत. दिल्लीच्या कॉलेज ऑफ आर्टमधून त्यांनी फाइन आर्टची पदवी घेतली तर आंबेडकर युनिव्हर्सिटी, दिल्ली इथून व्हिजुअल आर्टमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलं आहे. त्यांनी एकलव्यसोबत विविध प्रकल्पांसाठी काम केलं आहे. चित्रकला, क्युरेशन आणि शिकवणं यात त्यांना विशेष रस आहे. 2015 ते 2017 दरम्यान त्यांनी FICA (Foundation for Indian Contemporary Art) सोबत काम केलं. त्यांनी अनेक शोज आणि प्रदर्शनंही आयोजित केली आहेत. त्या दिल्लीत राहतात.

नात्यांचा एक सुंदर पोत असलेली ही गोष्ट,
कठीण परिस्थितीतही हार न मानणाऱ्या
मितवासारख्या प्रत्येक मुलीची आहे!



मूल्य: ₹ 45.00

parag

एकलव्य